Epitome : International Journal of Multidisciplinary Research
ISSN : 2395-6968

'चरथ, भिक्खवे, चारिकं बहुजनहिताय बहुजन सुखाय'–बुध्दाने भिक्खुना केलेला उपदेश

डॉ कला वासनिक
संशोधक मार्गदर्शक
डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र,
ब्रम्हपूरी, जिल्हा. चंद्रपूर

प्रा. स्निग्धा एस. सदाफळे
पालि विभाग प्रमुख
डॉ. आंबेडकर महाविद्यालय चंद्रपूर, जिल्हा. चंद्रपूर
Snigdha210675@gmail.com

ABSTRACT

गोतमबुध्द त्याच्या महापरिनिब्बानापर्यन्त बुहुजनांच्या हितासाठी व सुखासाठी पायी चारिका करित फिरला, तसेच लोकांना ज्ञांनी करण्यासाठी बुध्दाने भिक्खूंचा संघ तयार केला. बहुजन हिताय बहुजन सुखाय या पहिल्याच आदेशाला स्मरुन बुध्दाचा भिक्खुसंघ सर्वदूर ज्ञानाचा प्रचार प्रसार करित फिरला व यातून बहुजनांचे जीवन दुःखुमुक्त करित राहीला यावरुन ठामपणे म्हणता येते की बुध्द हे प्रथम सर्व शिक्षणाभियानाचे प्रणेते होते.

बिजसंज्ञा: चरथ भिक्खवे, बहुजन हिताय बहुजन सुखाय, भिक्खुसंघ, शिक्षण.

RESEARCH PAPER

प्रस्तावनाः

बुध्दोतर व तुर्कपूर्व भारताच्या इतिहासात, इतिहासाचा अभ्यास केल्यास असे दिसून येते की, वैदिकांनी ब्राम्हणवर्णाशिवाय कूठल्याही वर्णाला शिक्षणाची मनाई केली होती. फक्त वैदिकांना म्हणजेच ब्राम्हणांना शिक्षण देण्याची परंपरा वैदिकामध्ये असल्याचे बुध्दपूर्व इतिहासात दिसून येते. भारतात श्रमण परंपरा व ब्राम्हण परंपरा अश्या दोन परंपरा चालत आलेल्या आहे. श्रमण परंपरतून ज्ञान प्राप्त केलेली माणसे त्याचे ज्ञान सर्वांना सांगत असत. गोतम बुध्द ही याच श्रमणपरंपरेचे आहेत. बुध्दाने त्याने प्राप्त केलेला धम्म बहुजनांच्या हितासाठी व सुखासाठी आपल्या प्रशिक्षित भिक्खु संघाद्वारे सर्वदूर पसरविले याच्या या सर्व शिक्षा अभियानाची सुरवात त्याने भिक्खुसंघांना चरथ भिक्खवे चारिकं बहुजन हिताय बहुजनसुखाय या आदेशातुन केले.

गोतमाचा उपदेशः

गोतमाला सम्बोधी प्राप्त झाली. त्याला प्राप्त ज्ञान म्हणजे धम्म होय. त्याचा धम्म लोककल्याणासाठी असल्यामुळे, तो लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी त्याने संघ हे माध्यम निर्माण केले. "संघाची निर्मिती करणे हे त्याच्या दृष्टेपणाचे ऐतिहासिक कार्य होय."1 बुद्धाच्या काळात आजप्रमाणे प्रभावी प्रसारमाध्यमे नव्हती. बुद्धाने भिक्खूसंघालाच प्रभावी माध्यम बनविले. एक व्यक्ती एकावेळी, एकाच ठिकाणी राहू शकणार ही नैसर्गिक मर्यादा जाणूनच त्याने अनेक व्यक्ती (भिक्खू) निर्माण केले. संघाच्या रूपाने, जे एकाचं वेळी अनेक ठिकाणी त्याने पाठविले. विनयपिटकातील महावग्गात बुद्धाच्या सम्बोधी प्राप्ती नंतरचे जीवन सविस्तरपणे येते. त्यावरून असे दिसते की, भिक्खू संघाची निर्मिती ही सारनाथ येथे केली. त्यात पंचवग्गियभिक्खूसह, यश व त्याचे मित्र असे मिळून पहिल्याच वस्सावासात साठ भिक्खू तयार झालेत, ज्यांची उपसंपदा झाली होती. या साठ भिक्खूंना पवारना विधीनंतर बुद्धाने चारिका करण्याचा आदेश दिला तो खालील प्रमाणे होता.

"अथ खो भगवा ते भिक्खू आमन्तेसि" मुत्ताहं, भिक्खवे, सब्बपासेहि, ये दिब्बा ये च मानुसा। तुम्हे पि, भिक्खवे, मुत्ता सब्बपासेहि, ये दिब्बा ये च मनुसा चरथ, भिक्खवे, चारिकं

बहुजनहिताय बहुजन सुखाय लोकानुकम्पाय अत्थाय हिताय सुखाय देवमनुस्सानं। मा एकेन व्दे, अगतित्थ। दे सेथ, भिक्खवे, धम्मं आदिकल्याणं मज्झेकल्याणं परियोसानकल्याणं सात्थं सब्थब्जनं केवलपरिपुण्णं परिसुद्धं ब्रह्मचरियं पकासेथ। अन्ति सत्ता अप्पजक्खजातिका अस्सवनता धम्मस्स परिहायन्ति, भविस्सन्ति धम्मस्स अब्यातारी। अहं पि भिक्खवे, येन उरूवेला सेनानिगमो तेनुपसङ्का भिस्सामि धम्मदेसनाया' ति।"2

ज भिक्खूनो! मी मुक्त आहे सर्व पांशापासून जे प्रापंचिक व दिव्य आहेत आणि तुम्ही देखील या पाशांतून मुक्त झाले आहात. जा भिक्खूनो! बहुजनांच्या हितासाठी बहुजनांच्या सुखासाठी लोकांवर अनुकंपा (दया) करण्याकरिता देव आणि मनुष्याच्या हिताकरिता सुखाकरिता विचरण करा. एका मार्गाने दोघे जावू नका. भिक्खूंनो आरंभी कल्याणकारक, मध्यकल्याणकारक व शेवटी कल्याणकारक असलेल्या या धम्माचा योग्य अर्थांनी युक्त, योग्य शब्दप्रयोग करून सर्वत्र परिपूर्ण परिशुद्ध बुद्धाचा धम्म प्रकाशित करा."

संयुत्तनिकायातील "वृद्धिसुत्तात"3 वस्सवास काळ सोडता भिक्खूसंघाने सतत चारिका करीत राहिले पाहिजे हा आदेश आहे. त्याचप्रमाणे फिरणा–यात श्रेष्ठ कोण तर भिक्खूसंघ फिरणा–यात श्रेष्ठ होय असे या सुतात दिसते. भारतीय इतिहासातील ही पहिलीच यंत्रणा होय. जी मानवी कल्याणार्थ सतत चारिका करणारी ठरली. संघटीत, प्रशिक्षित व प्रभावी अशी ही पहिली संघटना ज्याला भिक्खूसंघ म्हणतात.

चारिकेचा उद्देश धम्मप्रचाराद्वारे मानवी जीवन दुक्खमुक्तं करणे हा होता. ही चारिका लोकांच्या कल्याणार्थ होती. बहुजनांच्या मुक्तीसाठी होती. बहुजनाच्या हितासुखासाठी भिक्खूनो चारिका करा असा सांगणारा बुद्ध हा प्रथम. "मज्झिमनिकायातील पोतलिय सुत्तानुसार भिक्खू कसा असावा हे सांगितले आहेत. त्याचप्रमाणे चारिकेत अतिरेक करू नये म्हणून अंगुत्तरनिकायातील 'पंचनिपातील तिस–या वग्गातील प्रथम सुत्तात' भिक्खूने संतुलीत वर्तन हा त्याच्या उपदेशाचा गाभा आहे हे दिसून येते. बुद्ध भिक्खूंना सांगतात, एका मार्गाने दोघे जावू नका. कारण लोकांपर्यंत दुक्खमुक्तीचे ज्ञान (धम्म) लवकर पोहचणार नाही. ते दुक्खमुक्त कसे होतील ह्याचं उदात्त हेतूने बुद्धाने एका मार्गाने दोन भिक्खूंना पाठविले नाही.

जगातील माणसे दुःखी आहेत. त्यांना दुक्खमुक्ती मिळवून देणे बुद्धधम्माचे कार्य आहे. "बुद्ध हा असा पहिला धर्मगुरू की, ज्यानं ज्ञानप्राप्तीसाठी आलेल्या आपल्या शिष्यगणांना

तत्वज्ञानाचा प्रसार करायला सांगितला. हा अधिकार त्यानं फक्त आपल्या हातात ठेवला नाही. इतरांविषयीच्या करूणेतून गावोगावी भटकतं केलं."6 बुद्धधम्माचं शिक्षण घेण्यासाठी प्रव्रज्जीत होणे किंवा उपसंपदा घेणे गरजेचे नव्हते. तर तीच शिकवण गृहस्थाश्रमात राहून देखील उपासक म्हणून ते तत्वज्ञान शिकू शकत होता.

"उपसंपदासुत्तं"7 चा सारांश असा की, ज्या गावात भिक्खू धम्माचा प्रचार करित असेल तेथे कोणाला धम्मात दीक्षा घेण्याची इच्छा बळावली तर तेथेच भिक्खूंनो त्याला प्रव्रज्जीत करावे. उपसंपदा द्यावी. माझ्यापर्यंत लोकांना आणू नये. बुद्ध हा जगातील एकमेव असा धर्मसंस्थापक होय, जो स्वतः एवढेचं महत्वं भिक्खूला देखील देतो. उपसंपदेचा त्याने विधी दिला. जो उपसंपदा सुत्तात दिसतो. बुद्धाने त्यांच्या धम्म पंचेचाळीस वर्षापर्यंत सर्व स्त्री–पुरूषांना भेद न करता सर्वांना तो शिकविला आणि भिक्खू संघानेही कोणताच भेद न करता तो शिकविला. बुद्धाने महापरिनिब्बाणाच्या क्षणापर्यंत धम्म शिकविला.

बुद्धाच्या हयातीतचं संपूर्ण भारतात बुद्धधम्माची लाट आली आणि तत्कालीन "अवंती–वसं–कोसल आणि मगध या चार राज्यात तो पसरला. बुद्धकालीन भारत ह्या चार राज्यात होते असे 'बुद्धिस्ट इंडिया'"8 या ग्रंथातून दिसून येते. या चार राज्यात बुद्धाचं वास्तव्य सर्वाधिक काळ होते. "तथागत ने सद्धर्म का उपदेश प्रधानतया मगध एवं कोशल के जनपदों में तथा शाक्य, लिच्छवी एवं मल्लं आदि गणराज्यो में किया था।"9 त्याच्या महापरिनिब्बाणानंतर तो आशिया खंडात पोहचला. यांचे श्रेय फक्त सुंसंघटीत अशा भिक्खूसंघालाचं जाते.

संदर्भ ग्रंथ

(1) साळुंखे आ.ह., सर्वोत्तम भूमिपुत्र :(2007) राकेश प्रकाशन, सातारा, गौतम बुद्ध, पृ. 475
(2) जगदिश कश्यप, महावग्गोपालि 'मारकथा',(1956) पृ. 23
(3) मोरे एम.एस., संयुत्तनिकाय वुट्ठिसुत्त, (२००९) कौशल प्रकाशन, औरंगाबाद, पृ. 34
(4) राहूल सांस्कृत्यायन, मज्झिमनिकाय पोतफियसुत्तं, (1991) पृ. 287
(5) मोरे एम.एस., अंगुत्तरनिकाय पञ्चचालिकावग्गो पठम अमाबसुत्तं, (1994) सांस्कृतिक बौध्द ग्रंथमाला पृ. 577
(6) आठवलेकर मंगला, बुद्ध हसतो आहे, (२००९) राजहंस प्रकाशन पुणे, पृ. 12
(7) जगदिश कश्यप, महावग्गोपालि उपसंपदासुत्त, पृ. 97
(8) जगताप सोपान, बौद्धमय भारत (अनु.) (२०१४) सम्यक प्रकाशन, सातारा, पृ. 22
(9) पाण्डेय गोविन्दचन्द, बौद्ध धर्म के विकास का इतिहास, (१९६३) हिन्दी सुचना समिती उत्तर प्रदेश लखनव. पृ. 192